भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७ /०१/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी तयार करुन रेती चेक पोस्ट येथील शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०६/०१/२०१७ चे २२.०० वा. दर. यातील आरोपी व त्याचे सोबत अंदाजे २० लोकांनी गैरकायदयाची मंडळी तयार करुन रेती चेक पोस्ट पवनी वरील कर्तव्या वरील महसुल विभागाचे कर्मचारी यांचेशी वाद घालुन रेती वाहतुक करणारे ट्रक चालकांना तपासनी न करता निघुन जाण्यास मदत केली. व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याने फिर्यादी सुखदेव खुशालराव वासनीक वय ५४ वर्ष, तहसील कार्यालय पवनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १४३,१८६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) ट्रक चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने चालवुन विंग मोशन सेंसर मशिनचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०६/०१/२०१७ चे ०४.३० वा. दर. यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन टोलनाका सेंदुरवाफा बुथ नं. ५ मधील विंग मोशन हाईट सेंसर मशिन तोडुन कि. ५०,०००/-रु. ची नुकसान केल्याने फिर्यादी धिरज ओमप्रकाश दिक्षीत वय ३० वर्ष, रा. सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,४२७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) एसटी बस चालकाने मारोती व्हॅनला धडक देवुन दोन जखमी. :-**

दिनांक ०६/०१/२०१७ चे १३.३० वा. दर. यातील फिर्यादी मनोज पुरुषोत्तम बगमारे वय ३२ वर्ष, रा. पांढराबोडी हा मित्रा सोबत आपली मारोती व्हॅन क्र. एमएच ३६ एच ५४५१ नी मामाच्या भेटी करीता साकोली कडुन सानगडी कडे जात असतांना सावरबंध शिवारात विरुध्द दिशेने येनाऱ्या यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील एस.टी बस भरधाव वेगाने, हयगयीन, लापरवाहीन व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मारोती व्हॅन चे ड्रायव्हर साईडला मागील बाजुस सावरबंध शेतशिवार जवळील डांबरी रोड येथे धडक दिल्याने पलटी होवुन त्यात फिर्यादीचे मित्र संभाष पुंडके वय ३८ वर्ष, रा. पांढराबोडी यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) दारूडया वाहन चालकावर कारवाई . :-**

दिनांक ०६/०१/२०१७ चे १७.२६ वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील पल्सर मोटार सायकल क्र. ३६ई ९०४७ चा चालक हा दारू पीवुन दारू चे नशेत चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अॅनालायझर मशीन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बडवाईक वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) औषधी फवारणी करतांना विषबाधा होवुन उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :-**

दिंनाक ०४/०१/२०१७ रोजी १९.०५ वा. दर. यातील मृतक गजानन दयाराम नागतोडे वय ५० वर्ष, रा. पाहुणगाव हा स्वतःचे धानावर औषधी फवारणी करतांना विषबाधा झाल्याने त्यास उपचारा करीता सा.रु भंडारा येथे नेवुन भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे डॉ. मेमो वरुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. नेताम पोस्टे लाखांदुर यांनी कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद केला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहे.

**६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-**

दिनांक ०६/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, तिन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७५ केसेस करण्यात आलेल्या आहे.

सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.